# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 09.04.2025** **वार-बुधवार**

---

**कोर दिवस**

दक्षिण कमांडमध्ये स्थित आर्मी ऑर्डनन्स कोरच्या सर्व एककांनी काल 250 वा कोर दिवस साजरा केला. 1775 मध्ये बोर्ड ऑफ ऑर्डनन्स नावाने स्थापित या कोरची तत्कालिन ब्रिटीश सैन्याला शस्त्र, दारुगोळा आणि उपकरण पुरविण्याची जबाबदारी होती. दक्षिण कमांडचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांनी या दिनानिमित्त आर्मी ऑर्डनन्स कोरचे कर्मचारी, अधिकारी यांचा सत्कार केला आणि त्यांच्या निष्ठेचे कौतुक केले.

**कोकाटे**

कृषी विभागातील प्रयोगशील अधिकारी, निवृत्त अधिकारी, प्रयोगशील शेतकरी, विद्यापीठ तसंच परदेशातून आलेलं ज्ञान, पिकांचे वाण लोकाभिमुख कसे करता येतील या दृष्टीकोनातून आगामी काळात प्रयत्न करण्यात येतील, असं कृषीमंत्री  माणिकराव कोकाटे यांनी आज पुण्यात राज्यस्तरीय कृषी अधिकारी आणि कर्मचारी  कार्यशाळेत बोलताना सांगितलं. या कार्यशाळेत कृषी विभाग आणि शेतकऱ्यांच्या समोरील वातावरण बदलाचे परिणाम, भविष्यातील संधी आणि आव्हानांना सामोरं जाणं, आणि शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवून त्यांना सक्षम करण्यावर विविध सत्रांमध्ये तज्ज्ञ मार्गदर्शन करण्यात आलं.

**शिरसाट**

सरकारं बदलली तरी योजना तळागाळापर्यंत जातात का हे पाहण्यासाठी आपण पुढाकार घ्यायला हवा अशी अपेक्षा सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाचे मंत्री संजय शिरसाट यांनी आज पुण्यात व्यक्त केली. महाराष्ट्र शासन आणि नीती आयोग यांच्या सहकार्यानं आज यशदा इथं "भारतामध्ये सहाय्यक तंत्रज्ञानासाठी अनुकूल परिसंस्था विकसित करणे' या विषयावर आधारित कार्यशाळेत ते बोलत होते. या कार्यशाळेत केंद्र आणि राज्य शासनाचे अधिकारी, संशोधन संस्था आणि आंतरराष्ट्रीय संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**कारवाई**

आरोग्य विभागानं दिलेल्या आदेशानुसार पुणे  महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून शहरातील 860 रुग्णालयांची तपासणी करण्यात आली. दर्जेदार सेवा, रुग्णांना सेवा मिळण्यास काही अडचणी आहेत का, रुग्ण हक्क संहिता, दरपत्रक, मोफत क्रमांक लावले आहे का याची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये  त्रुटी आढळलेल्या 89 रुग्णालयांना पुणे  महापालिकेच्या आरोग्य विभागानं नोटीस बजावली आहे.

**रक्तदान**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भारतीय संस्कृती संवर्धक संस्था आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाद्वारे सोमवारी 14 एप्रिलला शनिवार पेठेतल्या मोतीबाग कार्यालयामध्ये रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आलं आहे. सकाळी 9 ते दुपारी 1 या वेळेत या शिबिरात अधिकाधिक दात्यांनी रक्तदान करावं असं आवाहन आयोजक संस्थांनी केलं आहे.

**आवास**

पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून धानोरी, हडपसर, बाणेर, कोंढवा, बालेवाडी तसंच वडगाव खुर्द या पाच भागांत 4176 घरं बांधण्याचं नियोजन पुणे महापालिकेनं केलं आहे. त्यासाठी आतापर्यंत 6394 जणांचे अर्ज आले आहेत अशी माहिती महापालिकेचे शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांनी आज पत्रकारांना दिली. या योजनेतून 300 चौरस फुटांचं घर मिळणार आहे.

**व्याख्यानमाला**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या लोकमान्य टिळक अध्यासनाच्या वतीनं लोकमान्य टिळक स्मृती व्याख्यानमालेची आज सुरुवात झाली. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉक्टर न. म. जोशी यांनी "लोकमान्यांचा शिक्षण विचार" या विषयावर पहिलं व्याख्यान दिलं. लोकमान्यांच्या चतुःसुत्रीचा उल्लेख करुन राष्ट्रीय शिक्षणाशी संबंधित लोकमान्यांचा शिक्षण विचार, त्याची व्याख्या डॉक्टर जोशी यांनी सांगितली. लोकमान्यांनी केसरीत लिहिलेल्या विविध संपादकीयांपैकी 51 संपादकीय शिक्षणविषयक असल्याचं त्यांनी सांगितलं. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉक्टर सुरेश गोसावी, टिळक कुटुंबियांपैकी शैलेश टिळक आणि अध्यासन समन्वयक डॉक्टर पराग काळकर उपस्थित होते.

**नवकार**

विश्वशांती आणि विश्वकल्याणाठी जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन म्हणजेच जितोच्या पुणे विभागातर्फे आज  विश्व नवकार महामंत्र दिवसानिमित्त नवकार महामंत्राचं सामूहिक पठण करण्यात

आलं. भारतासह 108 देशांमधील नागरिकांनी या उपक्रमात सहभाग घेतला होता. पुणे आणि परिसरातून अंदाजे अकरा हजार स्त्री-पुरुषांनी नवकार महामंत्राचं पठण केलं.

**दीनानाथ मंगेशकर रुग्णालय**

दीनानाथ मंगेशकर रुग्णालय परिसरात 100 मीटर पर्यंत प्रतिबंधात्मक आदेश पोलिसांनी लागू केले आहेत. यानुसार रुग्णालय परिसरात रुग्णाचे नातेवाईक वगळता इतरांना बंदी घालण्यात आली आहे.19 एप्रिलपर्यंत हा आदेश लागू असेल.

**अवैध**

पुणे जिल्ह्यातील अवैध उद्योगांना आळा घालण्यासाठी ग्रामीण पोलिसांनी व्हॉट्सॲप helpline सुरु केली आहे. 9922892100 असा whatsapp क्रमांक असून, यावर नागरिक जिल्ह्यातील बेकायदेशीर कृत्यांची माहिती पोलिसांना देऊ शकतात, छायाचित्र, चित्रफितही पाठवू शकतात. अशा नागरिकांची नावं गुप्त ठेवली जातील आणि गुन्ह्याची तक्रार संबंधित पोलिस ठाण्यात केली जाणार आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**